प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;

For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २४ ऑक्टोबर २०२२

**परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सिडको अग्रेसर - मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे**

**दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर सिडकोच्या 7,849 घरांच्या महागृहनिर्माण योजनेचा करण्यात आला शुभारंभ**

**"विविध आर्थिक स्तरांतील नागरिकांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सिडको महामंडळ संपूर्ण देशात अग्रेसर आहे," असे प्रशंसोद्गगार मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी काढले.** सिडको महामंडळातर्फे दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर दि. 24 ऑक्टोबर 2022 रोजी प्रारंभ करण्यात आलेल्या 7,849 घरांच्या महागृहनिर्माण योजनेची घोषणा मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे केली, त्यावेळी त्यांनी हे उद्गार काढले. सिडकोच्या या महागृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील उलवे नोडमधील बामणडोंगरी, खारकोपर पूर्व2ए, खारकोपर पूर्व 2बी आणि खारकोपर पूर्व पी3 येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील 7,849 घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस 25 ऑक्टोबर 2022 पासून सुरुवात होणार आहे.

**सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेद्वारे पुन्हा एकदा हजारो कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यार असल्याचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आपल्या व्हिडिओ संदेशाद्वारे सांगितले.**

**“सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे भविष्यात उलवे नोडला मोठ्या प्रमाणावर महत्त्व प्राप्त होणार आहे. सिडकोने दिवाळीच्या शुभ**

**मुहूर्तावर आणलेल्या महागृहनिर्माण योजनेद्वारे परिवहनदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या उलवे नोडमध्ये घर घेण्याची संधी प्राप्त झाली आहे.”**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोतर्फे आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातली घरे उपलब्ध करून देण्यात येतात. सिडकोने नवी मुंबई क्षेत्रात आजवर सुमारे दीड लाखांहून अधिक घरे बांधून लक्षावधी कुटुबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार केले आहे. या वर्षीच्या दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर सिडकोने 7,849 सदनिकांची महागृहनिर्माण योजना आणली आहे. 'परिवहन केंद्रित विकास' संकल्पनेवर आधारित या योजनेंतर्गत उलवे नोडमधील बामणडोंगरी, खारकोपर पूर्व2ए, खारकोपर पूर्व 2बी आणि खारकोपर पूर्व पी3 येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांकरिता 7,849 सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबईतील झपाट्याने विकसित होणारा उलवे नोड हा परिवहन सुविधांनीही समृद्ध आहे. महागृहनिर्माण योजनेतील गृहसंकुलांना नेरूळ-उरण रेल्वे मार्गावरील बामणडोंगरी आणि खारकोपर रेल्वे स्थानकांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच प्रस्तावित मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) द्वारेही उलवे नोडला कनेक्टिव्हिटी लाभणार आहे. सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडपासून नजीकच्या अंतरावर आहे. गृहसंकुलांचा परिसर हा शाळा, महाविद्यालये, रुग्णालय इ. मूलभूत सुविधांनी परिपूर्ण आहे.

महागृहनिर्माण योजनेतील सर्व प्रक्रिया या पारदर्शक अशा ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत. योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २५ ऑक्टोबर २०२२ रोजी सुरुवात होणार आहे. योजनेची संगणकीय सोडत १९ जानेवारी २०२३ रोजी पार पडणार आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी, शुल्क भरणा इ. करीता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेऊन आपले हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्‌धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**